# स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटेक्निक येथे क्रिक हील फाउंडेशनतर्फे सायबर सुरक्षा जनजागृती सत्र संपन्न



लातूर/प्रतिनिधी - विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने क्विक हील फाउंडेशन यांच्या वतीने स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटेक्निक येथे द्वितीय व तृतीय वर्षाच्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग विभागातील विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्रात जाधव साहिल आणि परमेश्वर पांद्रे यांनी विद्यार्थ्यांना आजच्या डिजिटल युगातील वाढत्या सायबर धोक्यांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. सत्रादरम्यान फिशिंग हल्ले, बनावट वेबसाइट्स, फेक लिंक, फोटो मॉर्फिंग, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (-ख) माध्यमातून तयार करण्यात येणारे बनावट फोटो व व्हिडिओ, सोशल मीडिया फसवणूक, टठ कोड घोटाळे, जढझ व बँकिंग फसवणूक, ओळख चोरी (Identity Theft) यांसारख्या विविध सायबर गुन्ह्यांची माहिती विद्यार्थ्यांना उदाहरणांसह देण्यात आली. तसेच अशा फसवणुकींपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी क्विक हील फाउंडेशन विकसित टींलल्ज क्शरश्र -पींळींळींी विषयी विशेष माहिती देण्यात आली. अँटीव्हायरस संगणक व मोबाईलला व्हायरस, मालवेअर, रॅन्समवेअर, स्पायवेअर, फिशिंग हल्ले आणि इतर ऑनलाइन धोक्यांपासून कसे सुरक्षित ठेवते, तसेच अधिकृत सुरक्षा सॉफ्टवेअरचा वापर करण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.

विद्यार्थ्यांनी ऑनलाइन व्यवहार करताना सतर्क राहणे, मजबूत व वेगवेगळे पासवर्ड वापरणे, दुहेरी सुरक्षा सक्षम करणे, अनोळखी लिंकवर क्लिक न करणे आणि वैयक्तिक माहिती कोणासोबतही शेअर न करणे याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सत्रामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न विचारले. प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून सायबर सुरक्षेची माहिती मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल सुरक्षेविषयी अधिक जागरूकता निर्माण झाली.

सायबर सुरक्षित भारत घडविण्याच्या उद्देशाने विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल साक्षरता व सायबर सुरक्षेबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी क्विक हील फाउंडेशन सातत्याने अशा उपक्रमांचे आयोजन करत असून, हा उपक्रम त्याच दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरला.